डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत मूल ,जि .चंद्रपूर येथे स्थापन करण्यात आलेल्या शासकीय कृषि महाविद्यालयासाठी पदनिर्मिती करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन,
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पंदेवि १३१९ /प्र.क्र.४६/७-अे,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- १३ सप्टेंबर, २०१९.

संदर्भ :- १) शासन निर्णय क्र. पंदेवि १३१८/प्र.क्र.१०७/७-अे, दि. २८ फेब्रुवारी, २०१९
२) वित्त विभागाचे पत्र क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.४३/१९/आपुक, दि. २७ ऑगस्ट, २०१९

प्रस्तावना -:

संदर्भिय क्र. १ येथील शासन निर्णयान्वये डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत मूल, जि. चंद्रपूर येथे ६० विद्यार्थी प्रतिवर्ष प्रवेश क्षमतेचे शासकीय कृषी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

२. सदर महाविद्यालयासाठी, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या ५ व्या अधिष्ठाता समितीने निश्चित केल्याप्रमाणे शिक्षक वर्गीय ४५ पदे व शिक्षकेतर ६५ पदे अशी एकूण ११० पदे तत्वत: मंजूर करण्यास मान्यता देण्यात आलेली असून याबाबत उच्चस्तरीय समितीची औपचारिक मान्यता रितसर घेण्यात येईल, असे उक्त शासन निर्णयामध्ये निर्देशित करण्यात आले आहे. त्यानुसार मूल, जि. चंद्रपूर येथील शासकीय कृषि महाविद्यालयासाठी आवश्यक पदांचा प्रस्ताव उच्चस्तर सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता.

३. दि. ३ ऑगस्ट, २०१९ रोजी संपन्न झालेल्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीमध्ये, मूल, जि. चंद्रपूर येथील शासकीय कृषि महाविद्यालयाकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या पदांपैकी ३२ शिक्षकवर्गीय आणि ३५ शिक्षकेतर अशी एकूण ६७ नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली असून ९ मनुष्य दिवस इतक्या मनुष्यबळाच्या सेवा गरजेनुसार बाहयस्त्रोताद्वारे घेण्यास व मूलभूत स्वरुपाच्या अभ्यासक्रमासाठी गरजेनुसार घडयाळी तासिका तत्वावर शिक्षकवर्ग नियुक्त करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत मूल, जि. चंद्रपूर येथील शासकीय कृषी महाविद्यालयासाठी पदनिर्मितीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत मूल, जि. चंद्रपूर येथील शासकीय कृषी महाविद्यालयाकरीता परिशिष्ट - अ नुसार ३२ शिक्षकवर्गीय आणि ३५ शिक्षकेतर अशी एकूण ६७ नवीन पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे परिशिष्ट - ब नुसार ९ मनुष्य दिवस इतक्या मनुष्यबळाच्या सेवा गरजेनुसार बाहयस्त्रोताद्वारे म्हणजेच विहित प्रक्रियेने घेण्यास व मूलभूत स्वरुपाच्या अभ्यासक्रमासाठी गरजेनुसार घडयाळी तासिका तत्वावर शिक्षकवर्ग नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत मूल, जि. चंद्रपूर येथील शासकीय कृषी महाविद्यालयाकरीता मंजूर करण्यात आलेल्या ३२ शिक्षकवर्गीय आणि ३५ शिक्षकेतर अशा एकूण ६७ नवीन पदांच्या वेतनावरील पाच वर्षाचा खर्च तसेच आवर्ती व अनावर्ती खर्चाबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

३. ज्या पदांची कामे बाहययंत्रणेद्वारे करुन घेण्यास मान्यता दिली आहे, त्या पदांची कामे बाहययंत्रणेद्वारे करुन घेताना शासन परिपत्रक, वित्त विभाग, दि.२७.०९.२०१०, दि. ०२.०२.२०१३, दि. ०२.१०.२०१३ व दि. ०२.०८.२०१६ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करावे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौचारिक संदर्भ क्र. ४४०/आपुक, दिनांक १३.०९.२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१८३८२७०२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Gite Pratap Venkatrao

Digitally signed by Gite Pratap Venkatrao
DN: CN = Gite Pratap Venkatrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture and Animal Husbandry, Dairying and Fisheries Department
Date: 2019.09.17 18:49:54 +05'30'

(प्रताप गिते)
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.मंत्री (नियोजन व वित्त), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.मंत्री (कृषि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.राज्यमंत्री (कृषि), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,

६. सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
८. कुलगुरु / कुलसचिव / नियंत्रक डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
९. महालेखापाल, महाराष्ट्र १ / २ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१०.जिल्हा कोषागार अधिकारी/उप कोषागार अधिकारी, चंद्रपूर
११.मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१२.उप लेखा परिक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई,
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१५.वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई,
१६.नियोजन विभाग (कार्यासन - १४३१), मंत्रालय, मुंबई
१७.कार्यासन (७ अे) निवडनस्ती.

परिशिष्ट – अ

मुल, जि. चंद्रपूर येथील कृषि महाविद्यालयासाठी उच्चस्तर सचिव समितीने मान्यता दिलेली शिक्षक व शिक्षकेतर पदे

अ.क्र.	पदनाम	आवश्यक संख्या	वेतनश्रेणी
अ) शिक्षकवर्गीय पदे			
१	**सहयोगी अधिष्ठाता/प्राचार्य**	**१**	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
२	**प्राध्यापक**		
	कृषिविद्या	१	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
	कृषि वनस्पतीशास्त्र	१	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
	उद्यानविद्या	१	३७४००-६७००० ग्रेड पे १००००
	एकुण	**३**	
३	**सहयोगी प्राध्यापक**		
	कृषिविद्या	१	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	कृषि वनस्पतीशास्त्र	१	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	उद्यानविद्या	१	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	कृषि रसायन व मृदशास्त्र	१	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	कृषि किटकशास्त्र	१	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	कृषि वनस्पती रोगशास्त्र	१	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	कृषि अर्थशास्त्र	१	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	कृषि विस्तार	१	३७४००-६७००० ग्रेड पे ९०००
	एकुण	८	
४	**सहाय्यक प्राध्यापक**		
	कृषिविद्या	३	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	कृषि हवामानशास्त्र	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००

अ.क्र.	**पदनाम**	**आवश्यक संख्या**	**वेतनश्रेणी**
	कृषि वनस्पतीशास्त्र	२	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	उद्यानविद्या	२	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	कृषि रसायन व मृदशास्त्र	२	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	कृषि किटकशास्त्र	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	कृषि वनस्पती रोगशास्त्र	२	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	कृषि अभियांत्रिकी	२	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	पशुविज्ञान व दुग्धशास्त्र	२	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	कृषि अर्थशास्त्र	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	कृषि विस्तार	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	वनस्पती शरीर क्रियाशास्त्र	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
	एकूण	**२०**	
एकुण शिक्षकवर्गीय (अ)		**३२**	
ब) शिक्षकेतर पदे			
१	शारीरीक शिक्षण प्रशिक्षक/ सहा. प्राध्यापक (शारीरीक शिक्षण)	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
२	वरिष्ठ संशोधन सहायक	४	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००
३	कनिष्ठ संशोधन सहायक	४	९३००-३४८०० ग्रेड पे ४२००
४	कृषि सहाय्यक	४	५२००-२०२०० ग्रेड पे २४००
५	सहाय्यक कुलसचिव	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४६००
६	शाखा अधिकारी	१	९३००-३४८०० ग्रेड पे ४४००
७	वरिष्ठ लिपीक	२	५२००-२०२०० ग्रेड पे २४००
८	कनिष्ठ लिपीक	३	५२००-२०२०० ग्रेड पे १९००

अ.क्र.	पदनाम	आवश्यक संख्या	वेतनश्रेणी
९	विजतंत्री	१	५२००-२०२०० ग्रेड पे २४००
१०	सहा. ग्रंथपाल	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
११	ग्रंथालय सहायक	१	५२००-२०२०० ग्रेड पे १९००
१२	प्रयोगशाळा सहाय्यक	८	५२००-२०२०० ग्रेड पे २४००
१३	वसतिगृह अधिक्षक	१	१५६००-३९१०० ग्रेड पे ६०००
१४	वसतिगृह सहायक/वरीष्ठ लिपीक संवर्ग	२	५२००-२०२०० ग्रेड पे २४००
१५	कनिष्ठ अभियंता	१	५२००-२०२०० ग्रेड पे २८००
एकुण शिक्षकेतर पदे (ब)		**३५**	
एकुण पदे (अ+ब)		**३२+३५=६७**	

Gite Pratap Venkatrao

Digitally signed by Gite Pratap Venkatrao
DN: CN = Gite Pratap Venkatrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture and Animal Husbandry, Dairying and Fisheries Department
Date: 2019.09.17 18:50:12 +05'30'

(प्रताप गिते)
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन.

परिशिष्ट – ब

मुल, जि. चंद्रपूर येथील कृषि महाविद्यालयासाठी उच्चस्तर सचिव समितीने मान्यता दिल्यानुसार बाहयस्त्रोताद्वारे भरावयाची पदे

अ.क्र.	पदनाम	आवश्यक संख्या	मानधन
१	शेल्फ सहायक	१	--
२	सुरक्षा सहायक	१	--
३	परिचर	४	--
	वाहनचालक	३	--
एकुण (क)		९	

Gite Pratap Venkatrao

Digitally signed by Gite Pratap Venkatrao
DN: CN = Gite Pratap Venkatrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Agriculture and Animal Husbandry, Dairying and Fisheries Department
Date: 2019.09.17 18:50:25 +05'30'

(प्रताप गिते)
कार्यासन अधिकारी महाराष्ट्र शासन.